आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.com





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २५९ वा ● गुरुवार दि. २९ फेब्रुवारी २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## वेल्सच्या शिष्टमंडळाची विधानभवनाला भेट

मुंबई, : विधिमंडळाचे सध्या अंतरिम अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. विधिमंडळाची कार्यपद्धती जाणून घेण्यासाठी इंग्लंडमधील वेल्सच्या शिष्टमंडळाने विधानभवनाला भेट दिली.



यावेळी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांचे स्वागत केले. या शिष्टमंडळात वेल्सचे फ्युचर जनरेशन्स कमिशनर डेरेक वॉकर, वेल्स ट्रिनिटी सेंट डेवीड विद्यापीठातील उपकुलगुरु कार्यालयाचे चीफ ऑफ स्टाफ डॉ. शोन ह्युजेस आणि विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन ण्ड ह्युमॅनिटीज शाखेचे अधिष्ठाता डॉ. जेरेमी स्मिथ यांचा समावेश होता. त्यांनी विधानसभा व विधानपरिषद गॅलरीमध्ये उपस्थित राहून कामकाज पाहिले.

## गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांचा लातूर दौरा

लातूर, (जिमाका): राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे हे गुरुवार, २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

ना. सावे यांचे २९ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ९.३० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह लातूर येथे आगमन व राखीव. त्यानंतर सोयीनुसार लातूर येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे शासनाचे निर्देश

मुंबई, : राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबतची दक्षता सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांनी घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. याबाबतचे परिपत्रक शालेय शिक्षण विभागामार्फत जारी करण्यात आले आहे. ज्या शाळांमध्ये मराठी भाषा विषय शिकविला जात नाही, अशा शाळेची मान्यता किंवा ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याबाबतची तरतूद मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमातील कलम ४ मध्ये करण्यात आलेली आहे. ज्या शाळांमध्ये मराठी भाषा विषय शिकविला जात नसल्याचे विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या निदर्शनास आल्यास तसा अहवाल शासनास सादर करावा, शासनास अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावरुन संबंधित शाळेवर कारवाई करण्यात येईल, असेही या अनुषंगाने स्पष्ट करण्यात आले आहे.

कोविड-१९ संसर्गाच्या पार्श्र्वभूमीवर ताळेबंदीच्या कालावधीत शाळा नियमित सुरु नसल्याने राज्य मंडळाच्या शाळा वगळून इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये सन २०२२-२३ च्या आठवीची बॅच २०२३-२४ ला नववी मध्ये व २०२४-२५ ला दहावीला जाईल त्यांना एकवेळची बाब म्हणून मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरुपात मूल्यांकन करण्याबाबत दिनांक १९ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे सवलत दिली आहे. ही सवलत दिली असली तरीही राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे आहे. त्यामुळे मराठी भाषा विषयाचे श्रेणी स्वरूपात करण्यात आलेल्या मूल्यांकनाच्या नोंदी संबंधित शाळांनी ठेवाव्यात व त्याबाबतचा अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करावा. तसेच दिनांक १९ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे श्रेणी स्वरुपात मूल्यांकन करण्याबाबतच्या सवलतीचा चुकीचा अर्थ लावून मराठी भाषा पुरेशा गांभीर्याने शिकविली जात नसल्याचे काही ठिकाणी दिसून येत आहे. या सवलतीचा गैरवापर होत असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

राज्य शासनाच्या प्रचलित भाषा सूत्रानुसार व महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२० पासून करण्यात येत आहे. यासंबंधीच्या अधिनियमाची सन २०२०-२१ पासून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. कोविड-१९ संसर्गाच्या पार्श्र्वभूमीवर सन २०२२-२३ च्या आठवीच्या बॅचला एकवेळची बाब म्हणून मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरुपात मूल्यांकन करण्याबाबत सवलत देण्यात आली. ही सवलत फक्त एका बॅचपूरतीच मर्यादित होती. तसेच ही सवलत दिली असली तरीही राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे आहे हे स्पष्ट करण्यात आले आहे. या सवलतीचा चुकीचा अर्थ लावून मराठी भाषा पुरेशा गांभीर्याने शिकविली जात नसल्याचे काही ठिकाणी दिसून येत असल्याने याबाबतच्या अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आले आहेत.

## मतदान टक्केवारीत वाढ होण्यासाठी प्रयत्न करा

सांगली (जिमाका) : लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी सांगली लोकसभा मतदारसंघातील पूर्वतयारीचा आढावा घेतला.

यावेळी त्यांनी मतदान टक्केवारीत वाढ होण्यासाठी काय काय नियोजन केले जात आहे, याचा आढावा सर्व संबंधित सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी यांच्याकडून जिल्हा नियोजन समिती सभागृहत घेतला. यावेळी डॉ. राजा दयानिधी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती शिंदे आदी उपस्थित होते.

## महामार्गावरील, तीर्थक्षेत्रमधील तसेच पेट्रोल पंपावरील स्वच्छतागृहे पुरेशा प्रमाणात व सुस्थितीत ठेवण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात

**मुंबई, : राज्यातील सर्व महामार्गावरील, पेट्रोल पंपावरील आणि तीर्थक्षेत्र मधील सार्वजनिक स्वच्छतागृह ही अस्वच्छ व दुर्लक्षित आहेत. ती फार तुटपुंजी असून अनेक ठिकाणी शौचालयात आवश्यक असणाऱ्या प्राथमिक सुविधाही नाहीत. त्यामुळे प्रवाशांना व भाविकांना खूपच त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे सध्याची अस्तित्वातील सर्व स्वच्छतागृहे ही सुस्थितीत ठेवावीत.**

विधानभवनातील सभापती यांच्या दालनात महामार्गावरील व तीर्थक्षेत्रामधील तसेच पेट्रोल पंपावरील स्वच्छतागृहाच्या स्वच्छतेबाबत बैठक झाली. त्यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी सूचना दिल्या.

तसेच ज्या ठिकाणी स्वच्छतागृहे नाहीत त्या ठिकाणी अद्ययावत अशी स्वच्छतागृहे उभारली जावीत. त्या अनुषंगाने योग्य त्या उपाययोजना करण्यात



याव्यात. विशेषतः महिलांसाठीची स्वच्छतागृहे सुस्थितीत राहतील आणि त्यामध्ये पुरेसे पाणी, सॅनिटरी पॅड साठी मशीन, ओला व सुका कचरा टाकण्यासाठी स्वतंत्र कचरा पेटी, हात धुण्यासाठी साबण व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत खबरदारी घेतली जावी, अशा सूचना उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री रवींद्र चव्हाण यांना दिल्या.

त्यापुढे म्हणाल्या की, राज्यभर पेट्रोल पंपावर स्वच्छता गृहांची तपासणी विशेष मोहीम द्वारे करावी. व अस्वच्छ व दुर्लक्षित स्वच्छता गृहे तात्काळ दुरुस्त करून घ्यावीत. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्वच्छता गृहे उपलब्धतेबाबत प तयार करावे. या पमार्फत उपलब्ध स्वच्छतागृहांची माहिती लोकांना मिळेल. तसेच या स्वच्छता गृहांचे मानांकन करून पवर घ्यावे. त्यामुळे चांगल्या स्वच्छता गृहांची माहिती लोकांना या प मध्ये उपलब्ध होईल.

तसेच आळंदीसह राज्यातील सर्वच तीर्थक्षेत्रे, पर्यटन स्थळांच्या ठिकाणीही चांगली, आधुनिक व सर्व सोयींनीयुक्त अशी स्वच्छतागृहे बांधावीत, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

यावेळी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सांगितले की, याविषयासंदर्भात हमसफर संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्याचसोबत प्रत्येक हॉटेल व रिसॉर्ट मधील स्वच्छतागृहे सर्वांना व विशेषत: महिला प्रवाशांना कायद्याने खुली केली आहेत. परंतु त्याची माहिती सर्वदूर पोहचविण्यात येईल, असे मंत्री श्री. चव्हाण यांनी सांगितले. उपसभापती यांनी केलेल्या सूचनांनुसार लवकरच त्या अनुषंगाने तात्काळ उपाययोजना करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल असेही श्री. चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

## निवेदनांवर मुख्यमंत्र्यांची खोटी स्वाक्षरी; मुख्यमंत्री सचिवालयाकडून पोलिसांत तक्रार

मुंबई : कार्यवाहीसाठी आलेल्या काही निवेदनांवर मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे यांची बनावट स्वाक्षरी तसेच शिक्के असल्याचे मुख्यमंत्री सचिवालयाला निदर्शनास आले असून यासंदर्भात मरीन लाईन्स पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीनिशी शेरे असलेली निवेदने व पत्र पुढील कार्यवाहीसाठी ठिकठिकाणाहून मुख्यमंत्री सचिवालयास प्राप्त होत असतात. या निवेदनांची टपाल शाखेत नोंद होऊन ती ई ऑफिस प्रणालीत नोंद केली जाऊन संबंधित प्रशासकीय विभागांना पाठवण्यात येतात. नुकत्याच मुख्यमंत्री सचिवालयास प्राप्त झालेल्या दहा ते बारा निवेदनांवर मुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी आणि शिक्के संशयास्पद व बनावट असल्याचे कर्मचाऱ्यांना निदर्शनास आले. त्यांनी ही बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिली. मुख्यमंत्र्यांनी याची गंभीर दाखल घेतली असून तातडीने पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याचे निर्देश दिले.

यावरून मरीन लाईन्स पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत. कार्यालयीन कर्मचाऱ्यांनीही अधिक सतर्कपणे काम करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

## विविध प्रकल्प व योजनांतून देशाच्या भविष्याची पायाभरणी - मोदी

**यवतमाळ, : विविध योजना व प्रकल्पांद्वारे गेल्या १० वर्षात देशाच्या विकासाचा नवा पाया रचण्यात आला. देशाचा प्रत्येक कानाकोपरा विकसित करण्याचा आमचा संकल्प आहे. त्यासाठी गरीब, युवक, शेतकरी व महिला या घटकांच्या सशक्तीकरणासाठी व्यापक निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे विकासप्रक्रियेला गती मिळून देशाच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी होत आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.**

प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते विविध महत्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ, पंतप्रधान किसान सन्मान निधीअंतर्गत देशातील ९ कोटी शेतकरी कुटुंबांना एकूण २१ हजार कोटी रू. व महाराष्ट्रातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना सुमारे ६ हजार ९०० कोटी रू. चे वितरण, तसेच राज्यातील सुमारे पाच हजार कोटी रू. निधीतून रस्ते, रेल्वे व सिंचन प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन, तसेच यवतमाळ येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुतळ्याचे अनावरणही प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन,



कृषी मंत्री धनंजय मुंडे, मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड, इतर मागास, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार भावना गवळी, खा.हेमंत पाटील, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार नीलय नाईक, मदन येरावार, डॉ. अशोक उईके, संजीवरेड्डी बोदकुरवार,डॉ. संदीप धुर्वे, नामदेव ससाणे, इंद्रनील नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, गत १० वर्षातील योजनांच्या अंमलबजावणीने देशात पुढील २५ वर्षांच्या विकासाचा पाया रचला आहे. गरीब, नवयुवक, शेतकरी व महिला हे चार घटक सशक्त झाले तरच देश विकसित होईल. हे लक्षात घेऊन अनेक प्रकल्प व योजनांतून शेतक-यांसाठी सिंचन, गरीबांसाठी घरे, महिलांच्या स्वावलंबनासाठी अर्थसाह्य व युवकांच्या भविष्यासाठी भक्कम पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचा निधी थेट हस्तांतरित करण्यात येत आहे. ग्रामीण विकासासाठी हर घर जल, पीएम किसान निधी, लखपती दीदी योजना, स्वयंसहायता समूहाच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण आदी विविध योजनांचा त्यांनी उल्लेख केला.

प्रधानमंत्र्यांनी भाषणाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, संत सेवालाल महाराज, बिरसा मुंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन केले. मराठी व बंजारा भाषेतही त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मागील दशक देशासाठी सुवर्णकाळ ठरला असून त्याचे शिल्पकार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आहेत. महिला, शेतकरी, गरीब आणि तरुण या समाजाच्या चार स्तंभांना बळ देण्याचे काम त्यांनी केले. त्यांनी संपूर्ण जीवन देशाला समर्पित केले असून, 'नेशन फर्स्ट'च्या माध्यमातून देशाला पुढे नेत आहेत. महाराष्ट्र संपूर्ण ताकदीनिशी त्यांच्यासमवेत आहे, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शेतकरी सन्मान योजनेत ४ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असून, मोदी आवास योजनेत घरांमध्ये महिलांना घराचा संयुक्त मालकी हक्क मिळेल. साडेपाच लाख महिला बचत गटांना फिरता निधी उपलब्ध करून दिला जात आहे. गरीब, शेतकरी, युवक आणि महिलांसाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे प्रधानमंत्री श्री. मोदी यांचे लक्ष्य आहे. त्यानुसार राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरवर नेण्याचा आमचा निर्धार आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी झाल्यापासून महिलांसाठी अनेक महत्वाच्या योजना सुरू झाल्या. त्यांच्या सक्षमीकरणासाठी महिला बचत गटांना हजारो कोटींचे भांडवल आणि कर्ज देण्यात आले आहे. पालकमंत्री श्री. राठोड, खा. गवळी, आमदार डॉ. धुर्वे यांचीही भाषणे झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रधानमंत्री श्री. मोदी यांना बंजारा समाजाची पगडी, तसेच संत ज्ञानेश्र्वर महाराज यांची मूर्ती देऊन स्वागत करण्यात आले.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते विविध रस्ते, महत्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ व लाभ वितरण झाले.

## ०६ जिवंत काडतुस व गावठी कट्टयासह आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

लातूर (पोअका) : लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात विशेष पथक नेमून कार्यवाही करण्यात येत होती.

पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक २७/०२/२०२४ रोजी लातूर बायपास चे रेल्वे स्टेशन चौकातून एका इसमास ताब्यात घेऊन एक गावठी कट्टा(पिस्टल) सह ०६ जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाला गुप्त बातमीदार मार्फत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर इसम नामे १) जितेंद्र तुकाराम जाधव, वय ५१ वर्ष, राहणार चंद्रोदय कॉलनी, प्रकाश नगर, लातूर सध्या राहणार पिंटू हॉटेल जवळ, मळवटी रोड, लातूर यास रेल्वे स्टेशन चौक येथून ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी पिस्टल आणि सहा जिवंत राऊंड जप्त करण्यात आले.

याप्रकरणी पोलिस अमलदार खुर्रम असून पुढील तपास एमआयडीसी पोलिस गोपनीय माहितीचे संकलन व विश्र्लेषण संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील



काझी यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर नंबर १४७/२०२४ कलम ३ (१) २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद झालेला स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संदीप कराड हे करीत आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात अतिशय उत्कृष्टरित्या करून करून गावठी कट्टा व सहा राउंड बाळगणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पथका मधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, रवी गोंदकर , दीनानाथ देवकते, यशपाल कांबळे, रियाज सौदागर, प्रदीप स्वामी यांनी केली आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – राजकीय उलथापालती बरोबरच लोकसभा निवडणुकीचे रणसिंग फुकंले जात असतानाच दादाचे पत्र म्हणजे काय म्हणून जो काही राजकीय, सामाजिक गोंधळ होत आहे तो कशासाठी आणि दादाच्या त्या पत्रात नेमके काय आहे हेच कळत नाही, म्हणूनच डोकं बधीर झालय आहे, काहीच कळत नाही.

दुसरा – अरे, दादाच्या पत्राचे काय घेऊन बसलास. इब्राहिम लिंकनने गुरुजीला पत्र, छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्यांच्या सैनिकांना लिहिलेले पत्र, पंडित नेहरूंनी तुरुंगातून इंदिराला लिहिलेले पत्र साने गुरुजींनी त्यांच्या सुधाला लिहिलेले पत्र, किंवा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची स्थापना करणे गरजेचे असल्याबद्दल, प्र.के. अत्रे, जयप्रकाश नारायण, एस.एम. जोशी वगैरेंना लिहिलेले पत्र असो की या दादांनी सत्ता खुर्चीसाठी लिहिलेले पत्र यात जमीन आसमांचा फरक आहे. त्यामुळे दादाचे पत्र हे सोनेरी अक्षरात असले तरी अन् ते गटारात पडलेले असले तरी सोने म्हणून कोणी उचलणार नाही, वाचणार नाही समजले ! पत्राबद्दल बोलू नकोस, हे लक्षात ठेव.

एक – अहो, हे दादा कोण, ते महापुरुष, विचारवंत कोण आणि तुम्ही अशांची तशी तुलना करिता हेच काय ते गौडबंगाल कळत नाही.

दुसरा – अरे, तूच दादाचे पत्र म्हणून ओरडलास म्हणून बोलतो आहे. कारण सत्ताकारणात ज्यांची फरफट झाली ते गणपतराव देशमुख, नरसय्या आडम मास्तर, एन डी पाटील, मृणाल गोरे, अहिल्या रंगनेकर आदींचे जे काही हाल झाले ते सत्तेशिवाय लोकप्रतिनिधीचे वटवाघुळ होऊ नये म्हणून त्या दादाने ज्यांना ज्यांना पत्र लिहिले तेच आज सत्तेत आहेत. पण एकनाथ शिंदे यांचा करारी बाणा जरांगेनाच टोचला मग आपले काय म्हणून पत्राची घालमेल होत असेल तू शांत बस.

एक – अहो, असेच एक पत्र मी माझ्या स्वाक्षरीने हाती घेतला आहे त्याचे काय ?

# काय बोलता राव ?

मराठा आरक्षणाचा वाद विकोपाला गेला आहे. मराठा आरक्षणाला कोणाचाही विरोध नसल्याने शिंदे सरकारने मराठा आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला. पण जरांगेनी ओबीसीतूनच आरक्षण द्यावे असा हट्ट धरला असल्याने, मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण हे प्रकरण वादात पडले असतानाच वंचित बहुजन आघाडीचे नेते मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण हे वेगळेच ! अर्थात ताट, वाटा वेगळेच असावे असा सल्ला सरकारला दिला आहे.

**काय बोलता राव,**

अरे, सत्ताधाऱ्याचे ताट हे सर्वपक्षीय असते. विरोधकाचे ताट हे मोजक्याच पक्षाचे असते. ताट आणि वाटा हा सर्वांनाच त्यांच्या, त्यांच्या कुवतीप्रमाणे मिळतच असतो. पण आज घडीला मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षणाचे ताट वेगवेगळे आहे असे सांगणारे ड प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या वंचित बहुजन आघाडीचे ताट, वाटा तत्कालीन भारिप बहुजन महासंघाचे ताट,वाटा एकत्रित रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ताट,वाट्याचा प्रश्न कोठे झिरपत आहे, त्यांचे काय झाले, यांचा उलगडा करूनच दुसऱ्याला ताट, वाट्याकडे पहावे अशी लोक भावना व्यक्त होते आहे. मग काय ते बोला दाजीबा.रडू लागला असेल आणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सिबीआय, ईडी ही आमचेही कधीतरी बारा वाजतील म्हणून चिंताग्रस्त बनले असतील तर त्यात नवल कसले बोला दाजीबा !

# कर्मयोगी नरेंद्र मोदीजीच !

## संपादकीय...

राम हा कधी काळातील दशरथ राजाचा पुत्र होता. तो राजाही झाला नाही, तो वनवासातच राहिला. परंतु भारताचे कर्मयोगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीच आथक, तथक दहा वर्षाचा अपार कष्टातून आयोजित काळासार एकाच दगडाचा कोरीव राम देव म्हणून उभा केला आणि हजारो वर्षाच्या सीता व्याकुळ राम प्राणप्रतिष्ठापणेतून प्रधानमंत्री नरेंद्र यांनी देवातार म्हणून भारताला एक वरदानच दिले असे म्हटल्यास वावगे ठरू नये, अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

जगाला शांतीचा संदेश देणारा तथागत बुद्ध देव बनू शकला नाही, येशू ख्रिस्त देव बनला नाही, त्यांचेच संदेश, तत्त्वज्ञानच जनतेचा विश्वास आहे, छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभार केला, दुश्मनाला हाकलले, शाहू महाराजांनी रयतेचा विचार देऊन समाज प्रबोधन केले, जनतेची सेवा केली पण ते देव बनले नाहीत. परंतु रामाने केवळ सीता प्रेमापोटी रावणा विरुद्ध लढाई करून सीतेला प्राप्त केले, या पलीकडे त्यांचे कार्य, कर्तव्य दुसरे काहीतरी अदृश्य असले तरी आज भारतीय जनतेसमोर प्रभू रामचंद्र हे कांहीपासून एक देव आणि भारताच्या प्रगतीचे एक कालचक्र म्हणून तो एक विकासाचा मार्ग ठरविण्याचा जो ऐतिहासिक पराक्रम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे तो क्षण जगाच्या इतिहास कळ्या पाशान दगडात करून तो आयोध्येतील राम मंदिराच्या पायथ्याशी ठेवण्याची किमया अन्य कोणी केले नसते ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींनी केले म्हणूनच प्रभू रामचंद्र पेक्षा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचीच चर्चा अधिक होताना दिसते आहे. ते तमाम भारतीयांचे भाग्य ठरावे असे म्हटल्यास वावगे ठरू नये असे वाटते.

कारण राम लल्लात प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यातच राष्ट्रीय स्वयं संघाचे सरसंचालक मोहन भागवत यांनीच तमाम भारतीयांनी आपापसातील वादविवाद संपुष्टात आणून एकजूटपणे देशाला विश्र्व गुरु बनवण्यासाठी सज्ञ राहावे असे आव्हान केल्याने भारत देश हा मानवी समूह आहे, येथे देवी, देवतांचे मंदिर भाट,भटजी, साधू, महंत असले तरी मानवी समूहातील लोकच लोकांसाठी लोकप्रतिनिधी नियुक्त करून कारभार हाकत असतात. मग आयोध्येतील रामा नंतर दुसरा विश्र्वगुरू निर्माण करण्याची गरज काय अशी शंका आराम मंदिर राम प्रतिष्ठापना सोहळ्यातील लोक समूहातच होतानाची तशी चाहूल दिसून आली होती. मग उद्याच विश्र्वगुरू प्रधानमंत्री नरेंद्र मोदीच निश्र्चित असतील तर भाजपाच्या नेत्यांनी प्रधानमंत्री पदी नरेंद्र मोदी नकोत अशीच भावना मोहन भागवताने प्रकट केली की काय अशीच राजकीय वर्तुळात उलट सुलट कुजबूज होताना दिसत आहे. त्यामुळे देव पावतो की कोपतो हेच कळेनासे झाल्याचे कुजबुज जनसामान्यात होताना दिसते आहे.

अयोध्येतील राम मंदिर सोहळा हा लोकसभा निवडणुकीचा पहिला, वहिला प्रचार प्रसार सोळाच झाला असेल, आहे. सर्वत्र कुजबुज होत असतानाच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अखंड हुकमी, एकाधिकारशाहीच्या संकल्पनेलाच आरएसएसच्या मोहन भागवत यांनीच खोडा घातला की काय, अशीच प्रतिक्रिया उमटत असून, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विश्र्वासू मंत्री अमित शहा आणि राजनाथ सिंह, स्मृति इराणी मुद्दामच दूर ठेवले होते, असाच तर्क वितर्क काढला जात असून, उद्याची लोकसभा निवडणुकी भाजपाच्या महायुतीची की इंडियाची यशस्वी वाटचाल असावी. मोदीजी आणि भागवतजी यांनाच ठाऊक असावे अशीच अंदाज व्यक्त केला जातो, तो टाळता येण्यासारखा नसावा असे वाटते.

देव, धर्म पाळणे, मानणे पूजा, अर्चना, प्रार्थना करणे ज्यांचा, त्यांचा हक्क असला तरी पराक्रमी रयतेचे हिंदवी स्वराज्याचा निर्माता छत्रपती शिवाजी महाराज यांना देता छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावर मराठा, हिंदू मतावर डोळा ठेवून, सत्ता भोगणाऱ्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आयोध्येतील राम देव म्हणून भारताच्या विकासाची एक कालचक्र, विकास चक्र हे सूत्र कसे काय विस्तारले या विषयी मराठा नेते कार्यकर्ते मतदारात संभ्रम निर्माण झाल्याचीच कुजबुज अधिक होताना दिसते आहे.

भारतीय नागरिक हे कोणते जाती-धर्माचे असूत ते प्रवाह बरोबर वाहत असतात पण भारतीय समाज जीवनात राम भक्त कमी असताना रामाच्या नावावर कर्मयोगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विठ्ठल, पांडुरंग, तुळजाभवानी, महादेव, कृष्ण, बालाजी, साई भक्तांना, मराठा समाजाला नाराज केले अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे. ती अनाठाई की काय ते जनतेनेच ठरवावे.

# विश्वास थांबला की माणसं परकी होतात, आणि श्वास थांबला,की शरीर.

**माणसांचा विकास झपाट्याने होत की आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग माणूस जास्त करतो म्हणून त्याचा विकास होत आहे. हे ठरविण्यास लाखो लोक असमर्थ आहेत.ते लोक आधुनिक तंत्रज्ञानाचा परिपूर्ण उपयोग दररोजच्या जगण्यात घेऊन ही देवाची कृपया म्हणून पहिल्या पेक्षा जास्त प्रमाणात देवाला खुश करण्यासाठी किंवा त्याच्या आशीर्वादाची परत फेड करण्यासाठी पूजा,अर्चा,दान दक्षिणा मोठ्या संख्येने करतात. आपला जन्म माणसांची कोडी सोडवायला झालेला नाही. कुणाला आपल्याबद्दल काय वाटते,कोण काय विचार करतो,कोण आपला राग करतो आणि कुणाचा आपल्यावर विशेष लोभ आहे.या सगळ्यांपलीकडे जाऊन स्वतःला बघता आलं तर लक्षात येतं,...कुणी आसपास असल्या नसल्याने एका काळानंतर काहीएक फरक पडत नसतो. आणि दुरावल्यानेही जग बदलत नसते.आपले जग आपल्या आसपास फिरत असते.आणि दोन चार माणसं त्यात जा ये करत असतात.मला काय फरक पडतो हे बोलणे सोपी असते.**

मनाप्रमाणे जर त्यात जगता आलं तर आपण सुखी.वयाच्या एका विशीष्ट टप्प्यानंतरचा वेळ हा फक्त स्वतःचा असतो.त्यातही अमुकतमूक सोबत नसलं तर माझं काय होईल.वाली माणसे आपल्या पायात एकतर अडकतात नाहीतर आपल्याला तरी अडकून ठेवतात.ज्यांच्या आयुष्यात गुंतवणारी माणसे आहेत,त्यांच्याकडे असलेलं सुख म्हणजे निव्वळ आभास असतो.आणि हे कळायला ती चौकट आधी मोडावी लागते.चौकटीतल्या माणसांना ही भाषा कळत नाही, ती त्यांना समजावतंही बसू नये.कारण शेवटी तेच.आपला जन्म माणसांची कोडी सोडवायला झालेला नाही.शून्यातून विश्र्व कि,विश्र्वातून शून्य!!!.तीन रुम किचनचा एखादा फ्लॅट,दोन चार एकरचे फार्म हाऊस,एखादी चार चाकी गाडी आणि भौतिक वस्तूंचं प्रदर्शन मांडता आलं की आपण म्हणतो, अमक्या- तमक्यानं शून्यातून विश्र्व निर्माण केलं!!.म्हणजे होतंय काय की सुख मिळेल या आशेने माणूस श्रीमंत होण्यासाठी धडपडतोय. पण सुखी काही दिसत नाही !!

आपणचं म्हणतो की,आमच्या लहानपणी खूप मजा यायची.खूप करमायचं,घर भरलेलं असायचं. दिवस कधी मावळायचा ते कळायचंच नाही.मग आता काय झालं ?.मजा कुठ गेली ?.एकटं एकटं का वाटतं?.छातीत धडधड का होते ?.कशामुळे करमत नाही ?कारण विश्र्व निर्माण करण्याची व्याख्या कुठेतरी चुकली का ?.विश्र्व निर्माण करणं म्हणजेनाती गोती जपणं,हेच आपण विसरतो.पैसा आल्यावर स्वताला खूप मोठे समजून जवळच्या नात्यातील माणसांशी संबध तोडतो.त्यामुळेच माणूस सुखाच्या शोधात वेगळा पडतो.निसर्गाने मोफत दिलेले आहे त्याची किंमत समजून घेत नाही.म्हणूनच विश्र्वास थांबला की माणसं परकी होतात.आणि श्र्वास थांबला,की शरीर.

माणसांनी सुखी राहण्यासाठी छंद जोपासणं आवश्यक आहे.त्यासाठी काय केले पाहिजे. पाहुणे होऊन जाणं,पाहुण्यांचे स्वागत करणं,खूप गप्पा मारणं,घराच्या उंबऱ्यात चपलांचा ढिग दिसणं,खळखळून हसणं,आणि काळजातलं दुःख सांगून मोकळेपणाने रडणं या गोष्टी आपण प्राप्त करू शकलो तर शून्यातून विश्र्व निर्माण केलं असं म्हणावं.तुम्हीच सांगा आपल्या आयुष्यात या सर्व गोष्टींची वाढ झाली की घट झाली?. तुमचं खर दुःख तुम्ही मोकळेपणाने किती जणांना सांगू शकता?. असे किती मित्र,शेजारी,नातेवाईक आपण निर्माण करू शकलो.? खूप कमी,किंबहुना नाहीच.मग आपण विश्र्व निर्माण केलं का?. तर नाही.

सरकारी नोकरी करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांना वाटते रजिस्ट्री च्या कागदाच्या फायली म्हणजे विश्र्व?.भौतिक साधनांची रेलचेल म्हणजे विश्र्व? लॉकर मध्ये ठेवलेले हिरे मोत्यांचे दागिने म्हणजे विश्र्व?.मुखवटा घातलेल्या चेहऱ्यांची गर्दी म्हणजे विश्र्व?. नाही. हे समजून घ्यावं लागेल,मोठं बनण्याच्या दडपणामुळे आणि मग कामाच्या व्यापामुळे नाती दूर जाणार असतील, इतरांना तुच्छ लेखण्यामुळे आणि अहंकारामुळे माणसं जवळ येणार नसतील, दुःख सांगायला,मन हलकं करायला कुणीच नसेल,जागाच उरणार नसेल.तर?.आम्ही शून्यातून विश्र्व निर्माण केलं,की विश्र्वातून शून्य?. हा प्रश्र्न स्वतः ला विचारुन पहा - उत्तर नक्कीच मिळेल. वाचा,विचार करा,अहंकार सोडा,माणुसकी जपा. इतरांच्या कामी या.सोबत काहीचं येत नाही,हे पक्क लक्षात ठेवा.तरच आयुष्य फार सुंदर आहे.

खिशातून ५० ची एक नोट जरी पडली तर कावरा बावरा अन् बेचैन होणारा 'माणूस' आयुष्याची ५० वर्षे उलटली तरी परिवर्तन येत नाही,बिन्धास्तच वागतो. काय दुर्दैव आहे.स्मशानभूमीची सुरक्षा तपासणी किती 'कडक' आणि 'मजबूत' असते, हे तर विचारूच नका साहेब! अहो,पैसा तर फार दूरची गोष्ट आहे,इथे श्र्वासही सोबत घेऊन जाऊ देत नाही! तुम्ही कितीही मोठे किंवा तुमची थेट वर पर्यंत ओळख असली तरी.काळाचा कावळा आयुष्याच्या माठावर बसतो अन् रात्रंदिवस वय पीतो. 'माणूस समजतो: मी जगतोय.माणूस खाली बसून पैसे आणि संपत्ती मोजतो. काल किती होते आणि आज ते किती वाढले आहेत आणि वरती तो हसणारा माणसाचे श्र्वास मोजतो. काल किती होते आणि आज किती उरले आहेत.तर चला,उरलेले आयुष्य अवशेष बनण्यापूर्वी त्याला विशेष बनवूया.

पासबुक आणि श्र्वास बुक,दोन्ही रिकामे असल्यास भरावे लागतात.पासबुकात रक्कम आणि श्र्वास बुकात सत्कर्म म्हणून एकमेकांचा आदर करा. चुका विसरा.अहंकार टाळा.आयुष्य आहे तो पर्यंत हसत हसत घालवा.रडून वा भांडून तरी काय साध्य होणार?.

माणसाने जीवन जगताना खरंतर कंडक्टरसारखं राहता आलं पाहिजे.रोज वेगवेगळे प्रवासी सोबत आहेत,पण प्रत्यक्षात कोणीही आपलं नाही.रोजचा प्रवास आहे पण प्रत्यक्षात आपल्याला कुठही जायचं नाही,ज्यातून प्रवास करायचा ती बसही आपली नाही.बॅगेत असलेले पैसेही आपले नाहीत.ड्यूटी संपल्यावर सारं काही सुपूर्त केलं की झालं.मित्रांनो जीवन सुंदर आहेच,फक्त आहे त्याचा मनमुराद आनंद घ्या काही घेऊन गेला नाहीत तरी सगळ्यांच्या मनात राहून जा हेच जीवन आहे.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडूप,मुंबई.**

# कलेकडे झुकलेली मराठी भाषा अधिक समृद्ध आहे. - दीपक करंजीकर

मुंबई : (रवींद्र मालुसरे ) – शास्त्राशी जोडलेल्या भाषा आणि कलेशी जोडलेलया भाषा यामध्ये मराठी ही भाषा संपूर्णपणे कलेकडे झुकते. ४८ वर्ण, व्यंजने, त्यातले स्वर, उच्चराधित शब्द त्यातून तयार होणारी बोली यातून तयार होणारे पर्यावरण मराठी भाषेशिवाय कुठेही नाही. त्यामुळे मराठीला मी बेलबुट्टीची भाषा समजतो. भारतावर ७०० वर्षात अनेक आक्रमणे होऊनही हा देश स्वतःची संस्कृती जपत सर्वांना सामावून घेऊन उभा आहे. तसेच मराठीचे झाले आहे. आपली भाषा ही विस्तृत झाली आहे. मराठीतले अनेक शब्द इंग्रजीमध्ये प्रमाण म्हणून गेले आहेत. त्यामुळे मराठीच्या भविष्याबद्दलचा न्यूनगंड काढून टाका अहंगंड बाळगायला हरकत नाही मात्र आहे तो गंड बाळगायला हरकत नाही. सुंदरतेची आस असणारी महत्वाची देशातली भाषा म्हणजे मराठी भाषा आहे.भाषा हा आपल्या जगण्याचा अपरिहार्य भाग आहे असे मला वाटते. असे प्रतिपादन विख्यात लेखक, अभिनेते आणि सुजाण विचारवंत दीपक करंजीकर यांनी व्यक्त केले. दादर सार्वजनिक वाचनालय आणि धुरू हॉल ट्रस्टस, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रम दादर येथे आयोजित करण्यात आला होता. ते पुढे असेही म्हणाले की, जगात १० कोटी लोकांकडून बोलली जाणारी मराठी ही १० व्या क्रमांकाची भाषा आहे. भाषा दोन प्रकारे व्यक्त होते एक भाषेत पुस्तकं छापली जातात आणि ती बोलली जाते. आपली मराठी भाषा १३२ देशांमध्ये पोहोचली आहे. दरवर्षी ५०० दिवाळी अंक आणि २००० पुस्तके निघतात आणि देशातल्या अनेक भाषांमध्ये काहींची भाषांतरे होतात. प्रत्येक क्षेत्रांत मराठी माणसाने जे काम केले आहे ते माईलस्टोन ठरले आहे. जी. ए. कुलकर्णी यांच्यापेक्षा जगात कुणी मोठे नाही. शेक्सिपयरपेक्षा कानेटकरांच्या नाटकांचे विषय पाहिले तर त्यांचा पट मोठा आहे.

साहित्यप्रेमी आणि ज्येष्ठ स्तंभलेखक रविप्रकाश कुलकर्णी आपल्या भाषणात म्हणाले की, दिवाळी अंकांची कल्पना महाराष्ट्रातील काशिनाथ रघुनाथ



मित्र यांना सुचली ती बंगालच्या दुर्गापूजा अंकामुळे असे अनेक जण आजही बोलताना व लिहिताना दिसतात , परंतु हे चूक आहे हे आता सिद्ध झालेले आहे, तरीसुद्धा ही चूक दुरुस्त करण्याची तसदी आपले लोक का घेत नाहीत ही गोष्ट बंगाली आणि इंग्रजी दैनिकांतून ठसठशीतपणे यायला हवी. दिवाळीचा सण दिवाळी अंकांशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. मराठी संस्कृतीत अढळ स्थान लाभलेल्या या दिवाळी अंकांच्या वैभवशाली परंपरेचा आढावा घेताना ते पुढे म्हणाले की, 'दिवाळी-दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा' या उक्तींमधील आनंद दिवाळी साजरा करण्यातील अनेक गोष्टींइतकाच दिवाळी अंक हा त्याचा अविभाज्य भाग बनला आहे. त्यामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणित होतो. गेली ११४ वर्षे मराठी साहित्याचा हा जागर अखंड होत आहे. तो वृद्धिंगत करतांना मराठी वृत्तपत्र लेखक संघाचाही खारीचा वाटा आहे. हे सातत्य इतर भाषांमध्ये फारसे घडताना दिसत नाही. दिवाळी अंकांनी मराठी साहित्यातील विविध प्रकार हाताळले असून, त्यातून अनेक लेखक-साहित्यिक नावारूपास आले आहेत.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षप्रमुख आणि विशेष कार्यअधिकारी मंगेश चिवटे यांना यावेळी संस्थेचे सन्माननीय सभासदत्व प्रदान करण्यात आले. चिवटे यांनी महाराष्ट्रातील गोरगरिबांच्यासह सर्वांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कल्पनेतून आरोग्य कक्षाच्या माध्यमातून किती प्रमाणात आर्थिक मदत आणि सर्वोतोपरी सहकार्य केले जाते याचा समग्र आढावा आपल्या भाषणात घेतला. त्याचप्रमाणे मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचे आजोबा स्वातंत्र्यसेनानी आणि पत्रमहर्षी मनोहरपंत चिवटे यांच्या स्मरणार्थ दिवाळी अंकांच्या पुरस्कारासाठी ७५ हजार रुपयांची देणगी दिली. त्याचबरोबर संस्थेच्या जागेच्या अडचणींचा प्रश्र्न कायमस्वरूपी सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्र्वासन दिले. विख्यात शल्य चिकित्सक डॉ प्रणय पाठारे यांनी बालमोहनमध्ये मराठी भाषेत शिक्षण घेतल्यानंतर डॉक्टरकी करताना ती कसोशीने जपण्याचा प्रयत्न करतो यावेळी अनुभवाला येणाऱ्या गमती जमती त्यांनी आपल्या खूखूशीत भाषणात सांगीतल्या. संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी प्रास्ताविक केले. गेली ४९ वर्षे दिवाळी अंक प्रदर्शन आणि स्पर्धेची परंपरा संस्थेच्या अडचणीच्या काळात कशी पार पाडली जात आहे याच्यासह संस्थेच्या आणि भविष्यातील कार्याचा समग्र आढावा त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात घेतला.

यावेळी व्यासपीठावर दादर सार्वजनिक वाचनालयाच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती शुभा द कामथे, मराठी विचारधारा प्रतिष्ठानचे विश्र्वस्त ॲड. देवदत्त लाड, कार्याध्यक्ष रमेश सांगळे, कोषाध्यक्ष आत्माराम गायकवाड उपस्थित होते. 'ग्रंथ तुमच्या दारी' या उपक्रमाचे जनक नाशिकचे विनायक रानडे यांना ग्रंथालय चळवळीतील दिवंगत ज्येष्ठ कार्यकर्ते स्व. दत्ता कामथे स्मृती ग्रंथसखा' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अवतरण सकाळ (मुंबई ) साठी मनोरंजनकार' का र मित्र स्मृती सर्वोत्कृष्ट अंकाचा पुरस्कार ज्येष्ठ वृत्तसंपादक जयवंत चव्हाण आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत वसंतराव होशिंग स्मृती महिला संपादित उत्कृष्ट अंक - मनोरमा संपादिका सौ शोभा श्रीकांत मोरे सोलापूर यांनी स्वीकारला.

अक्षर, वेदान्तश्री, सामना, उद्याचा मराठवाडा या संपादकांसह द इनसाइट या अंकाचे संपादक पत्रकार सचिन परब यांनी तर संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्व विजया मनोहर कोळस्कर स्मृती अमृतप्रेरणा पुरस्कार काही दिवाळी अंकांना प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत ज्येष्ठ कामगार नेते स्व वसंतराव होशिंग स्मृती 'माझ्या बोलीभाषेचे मराठी साहित्य आणि व्यवहारातील स्थान' आणि पार्थ फाउंडेशन पुरस्कृत 'मराठी भाषेची चिंता आणि चिंतन' या विषयावर स्वबोलीभाषेत कुसुमाग्रजांना पत्र या दोन राज्यस्तरीय लेखस्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर आणि कार्यवाह नितीन कदम यांनी केले. दिगंबर चव्हाण, दत्ताराम गवस, विजय ना कदम, सुनील कुवरे, राजन देसाई, श्रीराम मांडवकर, पंकज पाटील, दिलीप ल सावंत आदी कार्यकर्त्यानी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील पैं. विष्णू सोपान तातपुरे यांचा सत्कार

लातूर : महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय,



लातूर द्वारा संचालित कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील पै. विष्णू सोपान तातपुरे यांनी चाकूर येथे शिवजयंती निमित्त आयोजित खुल्या कुस्ती स्पर्धेत चाकूर केसरी ही अंतिम किताबाची लढत जिंकून उज्वल यश संपादन केले. त्याबद्दल त्यांचा चांदीची एक किलो गदा आणि रोख रुपये एकवीस हजार देऊन चाकूर कुस्ती केसरीच्यावतीने यथोचित सन्मान करण्यात आला आहे.

त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्यावतीने त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन सत्कार करण्यात आला यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, डॉ. घनश्यम ताडेवार, प्रा. आशीष क्षीरसागर, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

पै. विष्णू सोपान तातपुरे यांना क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, डॉ. गुणवंत बिराजदार आणि प्रा. आशिष क्षीरसागर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या यशाबद्दल महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा बिडवे, सचिव मन्मथ अप्पा लोखंडे व सर्व पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंनी अभिनंदन केले आहे.

**समदुःखी ..**

चांगले काम चाले
जनता होते सुखी
प्रतिस्पर्धी गोटात
उठू लागे पोटदुखी
आनंद मिळे एका
दुसरा बनतो दुःखी
एकत्र येतात रडत
ते सगळे समदुःखी
दिलेला भला शब्द
शासनजेंव्हा राखी
विश्र्वासाचे मनगटी
शोभून दिसे राखी
अन्नखात असताना
शिव्या येतात मुखी
जितराब हरवी कुठे
अस्वस्थ का गुराखी
कुठे जरासे जळता
बडवत बसे ढोलकी
बदल कसा घडतोयं
प्रतिक्रिया ये बोलकी
खांद्यावर जिम्मेदारी
आनंदे चालेपालखी
घरच्या शुभ कार्यात
कामे नकाहीहलकी

**थुंकी ..**

दिलेला शब्द फिरवा
इकडचीतिकडे थुंकी
सगळे चालले चांगले
रे मध्येचं माशी शिंकी
खोट्याचा भरे तोबरा
शुभ्र चारित्र्या पचकी
खरे काय बोलताना
बरोबर लागते उचकी
रंगरंगिली वृत्ती दिसे
गालावर मारी टिचकी
स्वताच्याचं सावलीला
पाहून कशास दचकी
मिळेलं तितके लुटावे
भरुन टाकली बोचकी
दुस-यांची लफडे पहा
हळूहळूसगळी उचकी
चांगलेकाहीचं दिसेना
नजर बनलीयं डुचकी
अंगावर काही शेकता
हळू सट्कन खिचकी

**-- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

## पाण्यामुळेच सृष्टीचे चक्र फिरत असते – प्रा. डॉ. राजेश्र्वर खाकरे

बाभळगाव : आपल्या पूर्वजांनी



नद्यांना माता म्हटले आहे पण आपल्याकडे पर्जन्यमान कमी झाल्यामुळे आता या सगळ्या जीवनदायी असणाऱ्या नद्या कोरड्या पडत आहेत. पाण्याचा अपव्यय टाळणे प्रत्येकाच्या हातात आहे. पडणारा प्रत्येक थेंब हा नद्यांना आणि मानवी सृष्टीला जीवदान ठरत असतो. शेतकरी बंधारे, रेन वॉटर हार्वेस्टिंग याद्वारे पाण्याचा साठा केला तर आपले उद्याचे संकट टाळणार आहे. पाण्यावरच सृष्टीचे चक्र फिरत असते – असे प्रतिपादन जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथील भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजेश्र्वर खाकरे यांनी केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत चालत असलेल्या बहिः शाल व्याख्यानमाले अंतर्गत मौजे धनेगाव ( रोकडेश्र्वर ) येथे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत जलसाक्षरता काळाची गरज या विषयावर डॉ. खाकरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख डॉ. दशरथ भिसे यांनी केले. डॉ.जयदेवी पवार डॉ. पांडुरंग मुंढे, डॉ.मीनाक्षी कोंगे यांची यावेळी मंचावर उपस्थित होते.

सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी ओंकार सुरवसे तर आभार प्रदर्शन डॉ. अंगद कोते यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक गावकरी यांची उपस्थिती होती.

## काजू उत्पादन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी अनुदानाचा प्रस्ताव सादर करावा

मुंबई, : राज्यातील काजू दर कमी झाल्याने काजू उत्पादन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी गोव्याच्या धर्तीवर अनुदान देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले. काजू प्रक्रिया उद्योगाबाबत आणि काजू बियाणे अनुदान विषयी विधान भवनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, आमदार प्रकाश आबिटकर, राजेश पाटील, निलेश राणे, योगेश कदम, निरंजन डावखरे, माजी आमदार प्रमोद जठार आदींची उपस्थिती होती. मंत्री श्री. सत्तार म्हणाले, राज्यातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि कोल्हापूर जिल्ह्यातील आणि कोकणाशी संबंधित भागात काजूचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

# भटक्या, विमुक्तांच्या पालावर पोहचले जिल्हा प्रशासन !

लातूर, (जिमाका) : विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील घटकांना त्यांचा पालावर जावून शासकीय योजनांचा लाभ देण्याचा अभिनव उपक्रम आज लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने राबविण्यात आला. प्रशासनाने आपल्या दारात येवून शासकीय योजनांचा लाभ दिल्याने महाराणा प्रतापनगर ग्रामपंचायत क्षेत्रातील बुऱ्हानगर येथील पालावरील भटक्या विमुक्तांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले होते. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते जवळपास ९० व्यक्तींना विविध लाभांचे वितरण करण्यात आले.

जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी तुकाराम भालके, भटके विमुक्त विकास परिषदेचे नरसिंह झरे, राहुल चव्हाण यावेळी उपस्थित होते.

विविध कारणांमुळे विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. त्यानुसार राज्यात पहिल्यांदाच भटक्या, विमुक्तांच्या पालावर जावून त्यांना शासकीय योजनांची माहिती आणि लाभ देण्यासाठी विशेष शिबीर लातूर जिल्हा प्रशासनाने आयोजित केले होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनात आणि प्रमुख उपस्थितीत हा मेळावा पार पडला. महसूल विभाग, पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, समाज कल्याण विभाग, बँकेचे अधिकारी, कर्मचारी यांनी याठिकाणी उपस्थित राहून आपल्या विभागाशी संबंधित योजनांचे अर्ज भरून घेवून

लाभाचे वितरण केले. करण्यात आले होते. यावेळी विभागामार्फत प्रस्ताव तयार श दिले आहेत. त्यानुसार आज **जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे**











लातूर तालुक्यातील महाराणा प्रतापनगर ग्रामपंचायत क्षेत्रात बुऱ्हानगर येथे वैदू आणि मसणजोगी समाजातील कुटुंबांची वस्ती आहे. जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित केलेल्या शिबिरात महसूल विभागामार्फत रेशनकार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व दाखला, जातीच्या प्रमाणपत्राच्या संचिका वितरीत करण्यात आल्या, तसेच राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा योजनेचे अर्ज भरून घेण्यात आले. तसेच आरोग्य विभागामार्फत याठिकाणी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

आयुष्मान भारत कार्डचे वितरण करण्यात आले. शिक्षण विभागाने विमुक्त जाती व भटक्या जमाती घटकातील विद्यार्थ्यांना वह्यांचा संच वितरीत केल्या. बँकेमार्फत येथील नागरिकांचे बँक खाते काढणे, सामाजिक सुरक्षा योजनेचे अर्ज भरून घेण्यात आले. पुरवठा विभागामार्फत अंत्योदय योजनेतून साडीचे वितरण करण्यात आले.

प्रधानमंत्री आवास योजनेतून विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील नागरिकांना पक्के घर बांधून देण्यासाठी पंचायत समिती आणि समाज कल्याण

करण्यात येणार आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेतून घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देवून या नागरिकांना कायमस्वरूपी घर उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे गट विकास अधिकारी तुकाराम भालके यांनी सांगितले.

**वंचितांपर्यंत शासकीय योजना पोचविण्यासाठी विशेष मोहीम : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे**

विमुक्त जाती व भटक्या जमाती घटकातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी राज्य शासनाने विशेष शिबिरे आयोजित करण्याचे निर्दे

पहिल्याच शिबिराला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील नागरिकांना विविध शासकीय प्रमाणपत्रांसोबत विविध योजनांचा लाभही वितरीत करण्यात आला आहे. शासनाच्या योजनांचा लाभ देवून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन आणि प्रशासन प्रयत्नशील असून जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यामध्ये अशी शिबिरे आयोजित करून भटक्या, विमुक्त घटकांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

**यांचा महिला, मुलींशी संवाद**

विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील नागरिकांना विविध शासकीय योजनांच्या लाभाचे वाटप करण्यासाठी आयोजित कार्यक्रमाप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पालावरील कुटुंबियांशी संवाद साधला. विशेषतः महिला आणि मुलींची आपुलकीने विचारपूस करून त्यांना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. तसेच या समस्या सोडविण्यासाठी संबंधित विभागांना सूचना दिल्या. यावेळी शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याबद्दल या महिलांना आनंद व्यक्त केला.

## आगामी लोकसभा निवडणूक पूर्वतयारीसाठी लातूर जिल्हयात काँग्रेस पक्षाचे विधानसभा मतदारसंघनिहाय निरीक्षक जाहीर

लातूर (प्रतिनिधी ) : येत्या काही दिवसात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने राज्यभरात विधानसभा मतदारसंघनिहाय निरीक्षकांची नियुक्ती जाहीर केली आहे. यात लातूर जिल्ह्यातील ६ विधानसभा मतदारसंघातील निरीक्षक पुढील प्रमाणे जाहीर करण्यात आले आहेत. जिल्ह्यात होणाऱ्या संभाव्य स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर मागच्या वर्षीच माजी पालकमंत्री आ.अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे व शहर जिल्हाद्यक्ष ॲड.किरण जाधव यांनी लातूर जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघनिहाय निरीक्षकांची नियुक्ती जाहीर केली होती, या निरीक्षकांनी त्यांना नेमून दिलेल्या विधानसभा मतदारसंघात तेव्हापासूनच काम सुरू केलेले आहे,

त्याअगोदर झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळाले होते, त्या पार्श्र्वभूमीवर काँग्रेस पक्षाने नेमलेल्या निरीक्षकांनी, त्या त्या विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ नेते, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेऊन पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यासंबंधीचा अहवाल ही त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे सादर केलेला आहे.

संबंधित विधानसभा मतदारसंघात निरीक्षकांनी केलेल्या कामकाजाचा अहवाल लक्षात घेऊन, प्रदेश काँग्रेसनेही थोडा फार बदल करून निरीक्षकांची नियुक्ती केली आहे, ज्यांच्याकडे संघटनेचे महत्त्वाचे पद आहे, किंवा इतर जबाबदारी आहे त्यांना नियमित कामात वेळ मिळावा म्हणून तेथे दुसऱ्या पदाधिकाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती प्रदेश काँग्रेसने केली आहे.

आगामी लोकसभा निवडणूकीसाठी प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी लातूरचे माजी पालकमंत्री आ.अमित विलासराव देशमुख यांच्याशी चर्चा करून या नवीन निरीक्षकांची नियुक्ती जाहीर केली आहे. यात लातूर शहर मतदारसंघात रेना कारखान्याचे अध्यक्ष सर्जेराव मोरे,अहमदपूर मतदार संघात लातूरचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, उदगीर विधानसभा मतदारसंघात विलास सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रविंद्र काळे, निलंगा विधानसभा मतदार संघात माजी महापौर ॲड.दीपक सूळ,औसा विधानसभा मतदार संघासाठी विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष ॲड.समद पटेल आणि लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अनुप शेळके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाच्या वतीने नियुक्त करण्यात आलेले हे प्रभारी जिल्हाभरातील पक्षाचे ज्येष्ठ नेते,केंद्रिय तसेच राज्यस्तरावरील पक्षाचे पदाधिकारी,स्थानीक पातळीवरील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते

तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना यांचे प्रतिनिधी,नागरीक यांच्याबरोबर चर्चा करून पक्षाची बांधणी करतील,प्रभावी बूथ यंत्रणा उभारतील यासंबंधीची नियमित माहिती पक्षश्रेष्ठींना देतील असे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे व शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी संयुक्तरीत्या प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वर्धा ते कळंब रेल्वेगाडीचा शुभारंभ, लोकार्पण

यवतमाळ, : वर्धा – यवतमाळ – नांदेड या रेल्वे मार्गावरील वर्धा ते कळंब या रेल्वे गाडीचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. यावेळी वर्धा ते कळंब दरम्यान धावणाऱ्या विशेष गाडीला प्रधानमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवून ई-उद्घाटन केले. शुभारंभाप्रसंगी कळंब रेल्वे स्थानकावर खासदार रामदास तडस, रेल्वे अधिकारी आणि स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते.

वर्धा -यवतमाळ- नांदेड असा नवीन रेल्वे मार्ग झाला असून आज दि. २८ फेब्रुवारी रोजी या मार्गावरील वर्धा ते कळंब या टप्प्याचे लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाले. लोकार्पणाप्रसंगीच वर्धा ते कळंब रेल्वेगाडी देखील सुरु करण्यात आली. शुभारंभानंतर दि. २९ फेब्रुवारीपासून वर्धा ते कळंब गाडी क्रमांक ५१११९ आणि कळंब ते वर्धा गाडी क्रमांक ५१११२० च्या नियमित सेवा सुरू होणार आहेत.

### विज्ञान दिनाच्या निमित्ताने आधुनिक संशोधकांबरोबरच भारतीय संस्कृतीतील ऐतिहासिक संशोधनाचे स्मरणही तितकेच महत्त्वाचे – डॉ.भातांब्रे

लातूर – डॉ.भातांब्रे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत



असताना आजच्या आधुनिक काळात नावलौकिक कमावणारे अनेक वैज्ञानिक आहेत,त्यापैकी आपणा सर्वांचे गौरवस्थान असणाऱ्या सी व्ही रमण यांना अभिवादन केले.भारतीय प्राचीन इतिहास काळातील शुशृतांसारखे वैज्ञानिक काळाच्या ओघात विस्मरणात जाऊ नयेत म्हणून विज्ञान दिवस साजरा करताना त्यांचेही स्मरण केले जावे असे ते म्हणाले. दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२८ फेब्रुवारी २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने सी व्ही रमण यांना आदरांजली वाहून विज्ञान दिन साजरा करत असताना वैज्ञानिक कार्ल अन्र्स्ट वोन बेअर यांची २३२ वी, पीटर ब्रायन मेडावर यांची १०९ वी जयंती साजरी करण्यात आली.दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,लायन्स क्लब लातूरचे माजी प्रांतपाल डॉ.भातांब्रे व लायन्स क्लबचे संचालक श्री.सुधाकर जोशी यांनी कार्यक्रमाची सुरुवात वैज्ञानिकाच्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या प्रतिमेस वंदन करून केली. वैज्ञानिक कार्ल अन्र्स्ट वोन बेअर यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी.बी.टी. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी विजय बोने तर पीटर ब्रायन मेडावर यांच्याविषयी बी.एस्सी.बी.टी.प्रथम वर्षाची विद्यार्थीनी उफाडे विशाखा यांनी सांगितली. सी.व्ही.रमण यांच्या महान कार्याचा गौरव म्हणून विज्ञान दिवस साजरा करत असताना पर्णवी ढवारे यांनी रमण यांचे कार्य सर्वांना सांगितले. श्री.सुधाकर जोशी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले की, शिकत असलेले संदर्भ दैनंदिन जीवनाशी पडताळून पहावे,ज्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते व चौकस बुद्धी असणाऱ्या विद्यार्थ्यांमधून सी.व्ही.रमण सारखे वैज्ञानिक घडू शकतात. सर पीटर ब्रायन मेडावार हे ब्राझिलियन-ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ आणि लेखक होते, ज्यांचे कलम नकार आणि अधिग्रहित रोगप्रतिकारक सहनशीलतेचा शोध हे ऊतक आणि अवयव प्रत्यारोपणाच्या वैद्यकीय सरावासाठी मूलभूत आहेत.त्यांच्या वैज्ञानिक कार्यासाठी, त्यांना प्रत्यारोपणाचे जनक मानले जाते. व्यक्तिशः आणि लोकप्रिय लेखनातही ते त्यांच्या बुद्धिमत्तेसाठी लक्षात राहतात. रिचर्ड डॉकिन्स यांनी त्यांचा उल्लेख सर्व वैज्ञानिक लेखकांपैकी सर्वात हुशार असा केला. कार्ल अन्र्स्ट रिटर वॉन बेअर एडलर वॉन हुथॉर्न हे बाल्टिक जर्मन शास्त्रज्ञ आणि संशोधक होते. बेअर हे निसर्गवादी, जीवशास्त्रज्ञ, भूगर्भशास्त्रज्ञ, हवामानशास्त्रज्ञ, भूगोलशास्त्रज्ञ होते आणि त्यांना भ्रूणविज्ञानाचे संस्थापक जनक मानले जाते. ते रशियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचे सदस्य होते, रशियन जिओग्राफिकल सोसायटीचे सह-संस्थापक होते आणि रशियन एंटोमोलॉजिकल सोसायटीचे पहिले अध्यक्ष होते, ज्यामुळे ते सर्वात प्रतिष्ठित बाल्टिक जर्मन शास्त्रज्ञ बनले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.तसेच विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान मंचचे सदस्य प्रा.स्वरूप गावकरे व प्रा. श्रीनिवास कुलकर्णी आणि विद्यार्थी मंचचे पदाधिकारी विद्यार्थी तसेच विभागातील बी.एस्सी. प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## सरकारकडून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची घोषणा, अण्णाभाऊ साठे चौकात आनंदोत्सव साजरा

**लातूर – साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची घोषणा सरकारकडून करण्यात आली. त्याबद्दल शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथे रात्री साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मातंग समाज बांधवांच्या वतीने पेढे वाटून, फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला.**

अनुसूचित जाती पैकी महाराष्ट्रात लोकसंख्येने क्रमांक दोनवर असलेल्या मातंग समाजाचा देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत म्हणावा तसा विकास झाला नाही म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातून शासन दरबारी मागील अनेक वर्षापासून अनुसूचित जातीतील १३ टक्के आरक्षणात अ ब क ड वर्गीकरण करावे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र (बार्टी) च्या धर्तीवर स्वतंत्र आर्टी डॉ. अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करावी, अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या आर्थिक भाग भांडवलात वाढ करावी व पुणे येथील वस्ताद लहुजी साळवे यांचे स्मारक उभे करावे या प्रमुख मागण्या समाजाने लावून धरल्या होत्या यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी प्रमुख राजकीय पक्षातील समाजातील कार्यकर्ते यांनी तीव्र लढा उभारला होता.





गेल्या अनेक वर्षापासून राज्यात अनेक सरकार आले आणि गेले परंतु मातंग समाजाच्या मागण्याकडे प्रत्येक सरकारने दुर्लक्ष केले होते पण २०२४ च्या शेवटच्या अर्थसंकल्पातील अधिवेशनात अर्थमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ. अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याची, अण्णाभाऊ साठे महामंडळाचे भाग भांडवल वाढ करण्याची तसेच वस्ताद लहुजी साळवे यांचे स्मारक बांधकाम करण्याची घोषणा केली आहे त्यामुळे मातंग समाजाच्या शैक्षणिक आर्थिक सामाजिक विकासाला गती मिळणार आहे.त्यामुळे लातूर येथे सकल मातंग समाजाच्या वतीने सरकारच्या या घोषणेमुळे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकात जाहीर आभार व्यक्त करीत पेढे भरून तसेच फटाके फोडून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळ जल्लोष व्यक्त करण्यात आला.त्यावेळी राज क्षीरसागर, प्रा. शिवाजी जवळगेकर, प्रा. माधव गादेकर, दयानंद कांबळे, जी ए गायकवाड , सुनील बसपुरे, सुनील सौदागर, नाना कांबळे ,पत्रकार हणमंते पंडित दिनकर मस्के, नारायण कांबळे, मोहन सुरवसे, केशव शेखापुरकर,दशरथ घोणे, राहुल क्षिरसागर, बालाजी कलवले , गोरोबा लोखंडे,यांच्यासह शेकडो सामाजिक कार्यकर्ते आणि समाज बांधव उपस्थित होते.

## विज्ञानाच्या विद्यार्थ्याने 'हे असे का'? प्रश्न विचारायला हवा - डॉ.महादेव पंडगे

लातूर : विज्ञानाच्या विद्यार्थ्याने



नेहमीच हे असे का? हा प्रश्न विचारण्याची सवय जोपासली पाहिजे. त्या शिवाय तो प्रगती करू शकणार नाही.नाविन्याचा शोध लागणार नाही.आपल्या विचारांची पद्धत बदलली पाहिजे असे आवाहन दयानंद महाविद्यालयाचे प्राध्यापक, खगोलशास्त्रज्ञ डॉ.महादेव पंडगे यांनी व्यक्त केले. येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयात विज्ञान दिन साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.महादेव पंडगे सर तर अध्यक्षस्थानी अभिनव मानव विकास संस्थेचे सचिव श्री.कमलकिशोरजी अग्रवाल उपस्थित होते. क्षेत्रात संशोधन झालं आहे. तुमच्यासाठी ९५ टक्के क्षेत्रं खुलं आहे.सध्या संशोधनाच्या क्षेत्रात काम करण्याची गरज आहे.त्यासाठी मोबाईलपासून दूर राहून तुम्ही अभ्यास करण्याची गरज आहे.केवळ विज्ञानच नाही तर सर्वच क्षेत्रात संशोधनाला संधी आहे, असे मत डॉ.पंडगे यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात कमलकिशोरजी अग्रवाल यांनी वाचन आणि मनन करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे उद्घाटन जलविद्युत केंद्र प्रकल्पाचा नॉब फिरवून केले. जलविद्युतच्या मदतीने समई प्रज्वलित झाली. यावेळी ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, पर्यावरण शास्त्र या विषयातील १०९ प्रयोग मांडले होते.

विक्रम लँडरची प्रतिकृती, बायोगॅस, नवीकरणीय ऊर्जा, सौर ऊर्जेवर चालणारे मिरची कांडप, पवन ऊर्जा प्रकल्प, न्यूटन क्रॅडल, प्रदूषण दुष्परिणाम जागृती प्रकल्प यासारखे नावीन्यपूर्ण प्रयोग मुलांनी तयार केले होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ.चेतनजी सारडा, शालेय समितीचे अध्यक्ष पर्यावरण तज्ज्ञ श्री. अतुलजी देऊळगावकर यांनी प्रयोगांची पाहणी करून विद्यार्थ्यांचे कौतूक केले. दिवसभर चाललेल्या या प्रदर्शनाला विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनीही प्रयोग पाहण्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.रमाकांत स्वामी यांनी केले. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे सहशिक्षक श्री.मधुकर काळे यांनी तर आभार सहशिक्षक श्री.नंदकिशोर साळुंके यांनी मानले.पाहुण्यांचा परिचय सहशिक्षक श्री. दर्शन देशपांडे यांनी करून दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विज्ञान विभागातील सुरेखा भोसले, श्रीनिवास नाईक, निखील भिसे,संदीप मेळकुंदे यांनी प्रयत्न केले.

## शिवसेनेच्या रेट्यामुळे शिरूर अनंतपाळ, निलंगा येथील क्रीडा संकुलगाचा प्रश्न मार्गी; सोमनाथ स्वामी डिगोळकर

लातूर : लातूर जिल्हा मराठवाड्यात निश्चितच विकासात अग्रेसरपणे वाटचाल करीत आहे. पण कांही तालुक्यात विकासगंगा पोहचत नसल्याचे दिसते. निलंगा व शिरूर अनंपाळ तालुके हे कांही बाबतीत दुरदृष्टीचा अभाव असलेले लोकप्रतिनिधी खुर्चीवर विराजमान होत असल्यानेच विकास प्रक्रियेत मुलभूत सुविधेत हे तालुके विकासापासून कोसो दूर आहेत असे दिसते. निलंगा व शिरूर अनंतपाळ तालुक्यात सर्व मुबलक सुविधा असतांनाही येथे तरूणाची लक्षणीय संख्या व क्रीडा प्रेमी जनता असतांना येथील अनेक वर्षापासून तालुका स्तरावराचा क्रीडा संकुलाचा प्रश्न अद्याप सुटलेला नव्हत. तो दहा वर्षापासून राजकीय उावपेचात पिचत पडला होता. परंतू प्रलंबीत सदर प्रश्नी गत ५ वर्षापासून शिवसेनेने हा विकास अजेंड्यावर घेऊन या दोन्ही तालुक्यात क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात यावी अशी मागणी वारंवार निवेदनाद्वारे शिवसेना निलंगा विधानसभा प्रमुख सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी शासन, प्रशासन व सत्ताधारी आमदाराकडे अनेकवेळा केली होती. परंतू मतदार संघातील भाजपा आमदाराच्या आठमुठी धोरणामुळे हा प्रश्न राजकीय पेजात व श्रेयवादात अडकलेला होता. हा प्रलंबीत प्रश्न शिवसेनेच्या रेट्यामुळे मार्गी लागलेला असून निलंगा व शिरूर अनंतपाळ येथे राज्यशासनानी नुकतीच मंजूरी मिळाली असल्याचे तसेच सहा एकर जमीन व १० कोटी निधीची तरतुद केली असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी नुकतीच प्रसिद्धी पत्रकारद्वारे जाहिर केली आहे. सदर निलंगा व शिरूर अनंतपाळ येथील क्रीडा संकुलाच्या मागणीसाठी जिल्हाचे सुपूत्र व राज्याचे क्रीडामंत्री ना. संजय बनसोडे यांच्याकडे शिवसेनेच्या वतीने सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी तीन वेळा भेट देऊन निवेदनाद्वारे अग्रही पणे मागणी केली होती. परंतू या भागातील आमदार महोदयाच्या चुकीच्या धोरणामुळे तो प्रश्न अडगळीत पडलेला होता.

# ॲड.विनोद निला यांना राज्य उत्कृष्ट तालुकाध्यक्ष पुरस्काराने सन्मानीत

चाकूर, : महाराष्ट्र शासन,व्हॉईस ऑफ मीडिया व शेट ब्रिज मोहन लड्डा सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय उत्कृष्ट तालुकाध्यक्ष पुरस्कार चाकूर तालुकाध्यक्ष ॲड. विनोद निला यांना यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे मान्यवरांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले.

महाराष्ट्र शासन,व्हॉईस ऑफ मीडिया व शेट ब्रिज मोहन लड्डा सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय विविध पुरस्काराचे वितरण करण्यात आले.यावेळी राज्य उत्कृष्ट तालुकाध्यक्ष पुरस्कार मराठवाड्यातुन व्हॉईस ऑफ मीडियाचे चाकूर तालुकाध्यक्ष ॲड.विनोद निला यांना सोमवार दि.२७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे राज्याचे कौशल्य विकास मंत्री तथा मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा,माजी मंत्री तथा युवा सेना प्रमुख आ. आदित्य ठाकरे, आ. रोहित पवार, आ. यशोमती ठाकूर,आ.डॉ. राहुल पाटील,आयुष्यमान भारतचे महाराष्ट्राचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते व व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, कार्यालयीन सचिव दिव्या भोसले, मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया आदींच्या उपस्थितीत देऊन सन्मानीत करण्यात आले.

यावेळी तालुका सरचिटणीस संग्राम वाघमारे,जिल्हा कार्यवाहक सुधाकर हेमनर, सदस्य



सदाशिव मोरे, संजय पाटील, सतीश घुमाडे, निवृत्ती सोमवंशी, गणेश सूर्यवंशी आदि उपस्थित होते. व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने तालुक्यात पत्रकारांसाठी वैयक्तिक विमा, पत्रकार पाल्यांना खाजगी शिकवणी फीस मध्ये सवलत असे विविध उपक्रम व रक्तदान शिबीर आदि सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत.याची दखल घेवुन सदरचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्यामुळे निला यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# भाजपा राष्ट्रीय अधिवेशन राष्ट्रविकास व मजबूत संघटन बांधणी करणारे

लातूर : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या नऊ वर्षामध्ये शासनाच्या माध्यमातून केलेल्या कृषी, ग्रामीण विकास, युवा, महिला अशा विविध घटकासाठी राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती देऊन ९९१ जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात संघटन निर्माण केलेले आहे. १२ कोटी ५ लाख कार्यकर्त्यांचा डेटा पक्षाकडे उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे जगातील सर्वात मोठा पक्ष व कार्यकर्ते असलेला पक्ष म्हणून भाजपाला मान्यता मिळालेली आहे आणि त्याच संघटनाच्या जोरावर ३७० लोकसभेच्या जागा भाजपा पार्टीने व सहयोगी पक्षाने मिळून ४०० सिट जिंकण्याचे लक्ष्य ठेवले असल्याच्याही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली येथील राष्ट्रीय अधिवेशनामध्ये व्यक्त केलेले आहे. त्यामुळे भाजपाचे हे राष्ट्रीय अधिवेशन राष्ट्रविकास व मजबूत संघटन बांधणी करणारे ठरलेले आहे अशी माहिती भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी दिली.

अखिल भारतीय भाजपा राष्ट्रीय कार्यकारिणीचे अधिवेशन दि.१७ व १८ फेब्रूवारी रोजी भारत मंडपम प्रगती मैदान नवी दिल्ली येथे संपन्न झाले. या अधिवेशनात अत्यंत शिस्तबध्द व अत्यंत महत्त्वाच्या विषयावरती चर्चा व ठराव घेण्यात आले. यावेळी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.जे. पी.नड्डाजी, मा.ना.अमितभाई शहाजी, मा.ना. राजनाथसिंहजी, मा.ना.सौ.निर्मला सितारामनजी व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या अधिवेशनाला कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी.एस.येडीयुरप्पा, आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्यासमवेत मलाही उपस्थित राहण्याचा योग आला.

दि.१७ फेब्रूवारी रोजी झालेल्या राष्ट्रीय



अधिवेशनामध्ये देशातील भाजपा राष्ट्रीय पदाधिकारी मा.केंद्रीय व राज्याचे मंत्री मुख्यमंत्री विशेष खासदार, आमदार व राष्ट्रीय किसान मोर्चा, महिला व इतर आघाड्याच्या पदाधिकार्यांना प्रवेश देण्यात आला. या महत्त्वपूर्ण बैठकीमध्ये राष्ट्रीय महासचिव भाजपा खा.सुनिल बनसलजी यांनी संघटनेच्या बुथ स्तरापासून ते राष्ट्रीय स्थरापर्यंतच्या बांधणीची माहिती विस्तृतपणे दिली. भारत जगामध्ये अत्यंत गतीने विकसित होणारा देश म्हणून संपूर्ण जग भारताकडे पाहत आहे. निवडणुका पैश्याच्या जोरावर जिंकता येणार नाहीत तर त्या विकास व संघटनेची शक्ती यावरती जिंकता येतील असे मा.ना.नरेंद्रजी मोदीजीने सांगितले असल्याची माहिती २ दिवस राष्ट्रीय संमेलनात भाजपा किसान मोर्चा गोवा प्रभारी श्री.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी दिली.

मा.नरेंद्र मोदी यांनी भारताची प्रतिमा संपूर्ण जगामध्ये प्रचंड निर्माण केली आहे. देशाच्या पंतप्रधानांना जगातील ७८ टक्के जनता पसंत करते. त्यामुळे देशातील जनतेचा पूर्ण विश्वास मोदीजींवरती आहे. त्यामुळे फिर एक बार मोदी सरकार हा नारा यशस्वी होणार असा विश्वास घेऊनच सर्व कार्यकारिणीचे पदाधिकारी व कार्यकर्ते लोकसभा निवडणुकीसाठी कामाला लागतील असा विश्वास उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# तत्कालीन वैदयकीय शिक्षण मंत्री आ.अमित देशमुख यांच्या धोरणावर शिक्कामोर्तब

### लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैदयकीय महाविदयालयात १०० विदयार्थी क्षमतेचे परीचर्या महाविदयालय मंजूर

**लातूर : तत्कालीन वैदयकीय शिक्षण मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी निश्चीत केलेल्या धोरणानुसार विदयमान वैदयकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी वैदयकीय महाविदयालयाच्या ठिकाणी शासकीय परीचर्या पदवी महाविदयालय सुरू करण्याचा निर्णय घेतला असून यात लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय महाविदयालय व सर्वोपचार रुग्णालय येथे १०० विदयार्थी क्षमतेचे परीचर्या महाविदयालय सुरू करण्यास प्रशासकीय मंजूरी दिली आहे.**

कोरोना महामारीच्या काळात गंभीर रूग्णावर उपचार करण्याच्या कामी महाराष्ट्रातील सर्वच शासकीय वैदयकीय महाविदयालयानी महत्वाची भुमिका निभावली होती. त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हयाच्या ठिकाणी वैदयकीय महाविदयालय सुरू करावीत, अशी मागणी पूढे आली होती. सदरील परिस्थिती मागणी लक्षात घेऊन तत्कालीन वैदयकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी जिल्हा तिथे वैदयकीय महाविदयालय सुरू करण्याचा धारेणात्मक निर्णय घेतला होता. डॉक्टरांबरोबरच प्रशिक्षीत वैदयकीय कर्मचारी निर्माण करण्यासाठीही वैदयकीय महाविदयालयाच्या ठिकाणी परीचर्या महाविदयालय व इतर वैदयकीय शिक्षणाची महाविदयालये सूरू करण्याचा सदरील धोरणात समावेश करण्यात आलेला होता.

सदरील धोरणानुसार विदयमान वैदयकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी शासकीय वैदयकीय महाविदयालय व सलग्नीत रूग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रूग्णाची सुश्रुषा चांगल्या पध्दतीने व्हावी हा हेतू ठेऊन तयार लातूर येथे वैदयकीय महाविदयालय




**वैदयकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांचे माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी मानले आभार राज्यातील जनतेचे हीत आणि वैदयकीय महाविदयालयांची गरज ओळखून आपण आखलेल्या धोरणात कोण्ताही बदल न करता लातूरसह राज्यातील शासकीय वैदयकीय महाविदयलय ठिकाणी ७ परीचर्या पदवी महाविदयाये सुरू करण्यासाठी प्रशासकीय निर्णय**

**घेतल्या बददल राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विदयमान वैदयकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ व जिल्हयाचे पालकमंत्री गिरीष महाजन यांचे आभार मानले आहेत.**

लातूरसह जळगाव, बारामती, सांगली, मिरज. कोल्हापूर, नंदूरबार व गोदिया येथील शासकीय वैदयकीय महाविदयालयात प्रत्येकी १०० विदयार्थी क्षमतेचे शासकीय परीचर्या पदवी महाविदयालय (बीएससी नर्सींग) स्थापन करण्यास मंजूरी दिली आहे. यासाठी पहिल्या चार वर्षा करीता २०६.८५ कोटी रू. निधीची तरतूद केली आहे.

लातूर येथे महाविदयालयाची इमारत बांधून परीसरात परीचर्या महाविदयालय सुरू करण्यासाठी महाविदयालय व वसतीगृहाची इमारत बांधून तयार आहे. तत्कालीन वैदयकीय शिक्षण मंत्री सदरील महाविदयालय सुरू करण्यासाठी तेव्हाच इमारत व इतर सोयीसुवीधा उपलब्ध करून ठेवल्या आहेत. शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे आता आगामी वर्षात या महाविदयालयात प्रवेश सुरू होतील अशी अपेक्षा आहे.

## सार्वजनिक मंदिरे, धार्मिक स्थळांच्या ठिकाणी लिफ्ट, उतार रस्ता तयार करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका): जिल्ह्यातील विविध सार्वजनिक मंदिरे, धार्मिक स्थळांच्या ठिकाणी लिफ्ट अथवा उतार रस्ता (रॅम्प) यांची सोय उपलब्ध नसल्यामुळे दिव्यांग, शारिरीकदृष्ट्या अशक्त, आजारी, वयोवृध्द इत्यादी व्यक्तींनी दर्शनासाठी पायऱ्या चढून जाणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना सोई अभावी सार्वजनिक मंदिरे, धार्मिक स्थळे याठिकाणी ते भेटी देवू शकत नाहीत व दर्शनापासून वंचित राहतात, असे समाजातील काही हितचिंतक लोकांनी निदर्शनास आणून दिले आहे, तसेच याबाबत लातूर धर्मादाय सहआयुक्त यांनी केलेल्या पाहणीत ही बाब निदर्शनास साली आहे. तरी जिल्ह्यातील विविध सार्वजनिक मंदिरे, धार्मिक स्थळांच्या ठिकाणी लिफ्ट, उतार रस्ता तयार करण्याचे आवाहन धर्मदाय सहआयुक्त बंडोपंत कुलकर्णी यांनी केले आहे.

दिव्यांग, शारिरीकदृष्ट्या अशक्त, आजारी, वयोवृध्द व्यक्तींना मंदिर व धार्मिक स्थळास भेट देण्यासाठी व दर्शनासाठी संबंधित मंदिर अथवा धार्मिक स्थळाने सोय उपलब्ध करुन दिल्यास, अशा व्यक्ती देव दर्शन व तेथे साजरा होणारे धार्मिक उत्सव यांचा लाभ घेवू शकतील. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक मंदिरे व धार्मिक स्थळे या ठिकाणी दिव्यांग, शारिरीकदृष्ट्या अशक्त, आजारी, वयोवृध्द नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी उतार रस्ता (रॅम्प) व शक्य झाल्यास लिफ्टची सोय उपलब्ध करुन द्यावी, असे आवाहन श्री. कुलकर्णी यांनी केले आहे.

## पोस्ट ऑफिसमध्ये नवीन आधार नोंदणी आणि दुरुस्तीची सुविधा

लातूर, (जिमाका): धाराशिव डाक विभागातील लातूर मुख्य डाकघर कार्यालयातंर्गत ११ पोस्ट ऑफिसमध्ये नवीन आधारकार्ड व आधारकार्ड अद्ययावत (अपडेट) करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या केंद्राद्वारे नवीन आधारकार्ड तसेच आधारकार्डधारकाचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी, फोटो अद्ययावत करण्यात येतात. भारत सरकारच्या नवीन नियमानुसार ज्या व्यक्तींनी त्यांचे आधार १० वर्षे किंवा त्याहून आधी काढले किंवा अपडेट केले आहे, त्यांनी आधार अपडेट करणे आवश्यक आहे.

लातूर जिल्ह्यात लातूरमध्ये गांधी चौक येथील प्रधान डाकघर, मुरुड पोस्ट ऑफिस, किल्लारी पोस्ट ऑफिस, अहमदपूर पोस्ट ऑफिस, देवणी पोस्ट ऑफिस, उदगीर पोस्ट ऑफिस, औराद शहाजनी पोस्ट ऑफिस, औसा ऑफिस, चाकूर पोस्ट ऑफिस, निलंगा पोस्ट ऑफिस, टिळकनगर पोस्ट ऑफिस या धाराशिव डाक विभागाच्या लातूर अंतर्गत येणाऱ्या पोस्ट ऑफिसमध्ये आधार अद्ययावत केंद्र सुरु आहेत. तरी नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन धाराशिव विभाग मुख्यालय लातूरचे डाक अधीक्षक एस. एन. अंबेकर यांनी केले आहे.

## 'महासंस्कृती महोत्सव' अंतर्गत उदगीर येथे 'मराठी बाणा' कार्यक्रमाचे आयोजन

लातूर, (जिमाका): महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने लातूर जिल्हास्तरावर १२ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान 'महासंस्कृती महोत्सव'चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवांतर्गत १ मार्च २०२४ रोजी सायंकाळी ५ पासून 'मराठी बाणा' आणि स्थानिक कलाकारांचे कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले आहेत. उदगीर शहरातील तालुका क्रीडा संकुल (जुनी जिल्हा परिषद शाळा मैदान) येथे आयोजित या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

महासंस्कृती महोत्सव अंतर्गत उदगीर येथे आयोजित कार्यक्रमात सायंकाळी ५ ते ६ या कालावधीत स्थानिक कलावतांचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर ६ ते १० पर्यंत 'मराठी बाणा' हा कार्यक्रम सादर होईल. या कार्यक्रमाची संकल्पना, लेखन, दिग्दर्शन अशोक हांडे यांचे आहे.

## व्हॉईस ऑफ मीडियातर्फे २ मार्च २०२४ रोजी महाआरोग्य शिबिराचे आयोजन

लातूर : लातूर जिल्ह्यातील पत्रकारांसाठी व्हॉईस ऑफ मीडिया संघटना, एम.आय.एम. एस.आर.आय. आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने २ मार्च २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्ह्यातील व्हॉईस ऑफ मीडियाच्या सदस्यासाठी यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय परिसरातील नेताजी सुभाषचंद्र बोस सभागृहात महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. या महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन भाजपा नेते तथा आ.रमेश कराड यांच्याहस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी व्हाईस ऑफ मिडीयाच्या सदस्यांना मान्यवरांच्याहस्ते आयुष्यमान भारत कार्डचे वितरणही करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, अधिष्ठाता एन.पी.जमादार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे या महाआरोग्य शिबीराचा लाभ जिल्ह्यातील व्हॉईस ऑफ मीडियाच्या सदस्यांनी घ्यावा असे आवाहन लातूर व्हॉईस ऑफ मीडियाचे लातूर जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या सभेस अलोट जनसागर

यवतमाळ : यवतमाळ जिल्ह्यातील विविध प्रकल्पांचे भूमिपूजन, लोकार्पण व लाभ वितरण कार्यक्रमासाठी आलेले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सभेला अभूतपूर्व जनसागर लोटला होता. या सभेला जिल्हाभरातील बचत गटाच्या महिलांची उपस्थिती सर्वांचे लक्ष वेधणारी होती. यवतमाळ शहराजवळील डोरली येथे आयोजित प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या या सभेला जिल्ह्यातील अंदाजित तीन लाखहून अधिक महिला, शेतकरी, युवकांची उपस्थिती लक्षणीय ठरली. या कार्यक्रमात वर्धा - कळंब रेल्वे मार्ग या टप्प्याचे लोकार्पण व नवीन रेल्वे गाडीचा शुभारंभ, न्यू आष्टी-अंमळनेर रेल्वे, अंमळनेर- न्यू आष्टी स्टेशनपर्यंत विस्तारित रेल्वे सेवेचा शुभारंभ, इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी मोदी आवास योजनेचा शुभारंभ, पीएम किसान सन्मान निधीच्या १६ व्या हप्त्याचे थेट बँक खात्यात वितरण, नमो शेतकरी महासन्मान निधी अंतर्गत दुसऱ्या आणि तिसऱ्या हप्त्याचे वितरण, यवतमाळ येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुतळ्याचे अनावरण, आयुष्मान भारत अंतर्गत महाराष्ट्रात एक कोटी आयुष्मान कार्डचे वितरण, मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत महिला बचत गटांना फिरत्या निधीचे वितरण, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्यातील सहा प्रकल्पांचे लोकार्पण, बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्यातील ४५ सिंचन प्रकल्पांचे लोकार्पण, रस्त्यांचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रधानमंत्री मोदी या सभास्थळी पोहोचताच उपस्थित नागरिकांमध्ये उत्साह दिसून येत होता. त्यांच्या नावाच्या जयघोषाने संपूर्ण सभास्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894